# प्रेसनोट

**दिनांक २३/०९/२०२१**

**नागरिकांचे गहाळ मोबाईल शोधून परत करण्याची सायबर काईम शाखेची यशस्वी कामगीरी.**

सध्या बृहन्मुंबई महानगरात व्यस्त व धावपळीच्या जीवनात मोबाईल गहाळ होण्याचे प्रमाण खूप जास्त आहे.सदर मोबाईल शोधून हस्तगत करण्याकरीता सायबर शाखा मंबई यांनी विषेश पोलीस पथकाची नेमणुक करून स्थानिक पोलीस ठाण्यांकडून गहाळ झालेल्या मोबाईलची माहिती गोळा केली. सदर मोबाईलबाबत तांत्रिक तपास करून उपलब्ध माहितीचे कौशल्यपूर्वक विश्लेषण करून कमी कालावधीत अथक परिश्रम करून गहाळ मोबाईल आयफोन, लॅपटॉप सद्या वापरत असणाऱ्या व्यक्ती, त्यांचे मित्र, नातेवाईक, सहकारी यांना संपर्क साधून एकूण अ.कि.रु. ५८,०५,६२०/- चे २८५ मोबाईल हस्तगत करण्यात यश प्राप्त करून बृहन्मुंबई पोलीस दलाची प्रतिमा जनमानसात उंचाविलेली आहे. गहाळ झालेले मोबाईल केवळ मुंबईतून नाही तर उत्तरप्रदेश, बिहार, केरळ, कर्नाटक, गुजरात, राजस्थान या परराज्यातून तसेच दुबईमधून देखील हस्तगत करण्यात यश प्राप्त केले आहे. तसेच सदर हस्तगत मोबाईल मुळ मोबाईल धारकांना मा. सह पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. मिलींद भारंबे यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आले.

सदर यशस्वी कामगीरी मा. सह पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. मिलींद भारंबे, मा. पोलीस उपआयुक्त, सायबर विभाग, डॉ. रश्मी करंदीकर, मा. सहायक पोलीस आयुक्त नितीन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व.पो.नि. संजय गोविलकर, पो.नि सविता शिंदे, पो.नि. मौसमी पाटील यांचे देखरेखीखाली पोउनि अनिल जंगम, पो.उ.नि. सुयोग अमृतकर, पो.ह.क्र. ३३४०५/ राजेश खुशलानी, पो.ना. ०६०७५९ /नंदकिशोर महाजन, पो.शि.क्र. १९१६९८ /ओमकुमार शिंदे, पो.शि.क्र /११३१६५ जय गदगे, पो.शि.क्र ११२९४९ /दिपक पाटील यांनी पार पाडली

Scanned with CamScanner